विषय: अकृषिक आकारणी

ज्या अकृषिक प्रयोजनासाठी जागेचा वापर अंशत: वा संमिश्र स्वरूपात केला जात असेल त्यांच्या प्रमाणानुसार अकृषिक आकारणी करणेबद्दलच्या सूचना.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग.
परिपत्रक क्र. एनएपी ३४८१/१३०४२/सीआर ५१३ ल-२ दि. १६/६/८६.

परिपत्रक

जिल्हाधिकारी, पुणे यांनी नागरी क्षेत्राचे झापाट्याने औद्योगिकरण होत आहे आणि त्यामुळे काही भूखंडधारक नागरीक्षेत्रामधील जागेचा वापर अंशत: निवासी-नि-औद्योगिक अथवा निवासी-नि-वाणिज्यिक आदि वेगवेगळ्या प्रकारच्या व वेगवेगळ्या प्रमाणात संमिश्र प्रयोजनासाठी करीत आहेत असे शासनाचे निदर्शनास आणून दिले आहे. शासन निर्णय महसूल विभाग क्र. एनएए १२५३ दि. १०/८/१९५३ मधील परिच्छेद क्र. ३[दोन] [संबंधित उतारा जोडलेला आहे.] नुसार ज्यावेळी भूखंडधारकाकडून जागेचा वापर संमिश्र अकृषिक प्रयोजनासाठी होत असेल त्यावेळी संबंधित जागेचा जो प्रमुख अकृषिक वापर निश्चित होत असेल त्याप्रमाणे त्या संपूर्ण भूखंडासाठी अकृषिक आकारणी करावयाची असे आदेश हयापूर्वी दिलेले होते. त्या आदेशांचा गैरफायदा कांही भूखंडधारकानी घेऊन शासनाला संबंधित भूखंडधारकांकडून कायदेशीरपणे जो अधिक महसूल मिळणे क्रमप्राप्त होते असे त्याला मुकावे लागते असे कळविले आहे. जिल्हाधिकारी, पुणे यांनी त्यादृष्टीने शा. निर्णय महसूल विभाग क्र. एनएए १२५३ दि. १०/८/५३ मध्ये योग्यती दुरुस्ती करावी असा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे.

२. शासनाने सदरहू प्रस्तावाचा सर्वंकष विचार करून आणि कायदेशीररित्या कांही अडीअडचणी निर्माण होतील अगर कसे हयाबाबत विधी व न्याय विभागाशी शहानिशा करून तपासणी केली आहे. सदरहू अभिप्रायाचे अनुषंगाने शासनाचे असे आदेश आहेत की, अकृषिक प्रयोजनासाठी जागेचा होत असलेला वापर विचारात घेऊन कशा पध्दतीने अकृषिक आकारणी करावयाची या बद्दलची तरतूद म.ज.म.अधिनियम, १९६६ च्या कलम ११४[१] [अ] [ब] [क] आणि [ड] मध्ये आहे. त्यानुसार ज्यावेळी भूखंडाचा संमिश्र स्वरूपात अकृषिक प्रयोजनासाठी वापर केला जाईल त्यावेळी भूखंडाचा अंशत: वेगवेगळ्या प्रयोजनासाठी होणारा अकृषिक वापर लक्षात घेऊन संबंधित अकृषिक प्रयोजना--साठी निश्चित केलेल्या प्रमाणदराप्रमाणे अंशत: वापर होत असलेल्या क्षेत्रासाठी आकारणी करणे संबंधित तरतुदींना अनुरूप आणि कायदेशीर होईल. जेव्हा नागरी विभागातील भूखंडाचा वेगवेगळ्या प्रकारच्या अकृषिक प्रयोजनासाठी

जिल्हाधिकारी रत्नागिरी कार्यालय 24 JUN 1986

प्रमाणानुसार संबंधित अकृषिक प्रयोजनासाठी निश्चित केलेला प्रमाणदर लक्षात घेऊन अकृषिक आकारणी ठरवावी लागेल. यामध्ये मजले असलेल्या व वेगवेगळे मजले वा त्यांचे भाग वेगवेगळ्या प्रयोजनासाठी वापरण्यात येत आहेत अशा इमारतींचाही समावेश राहील.

३. वरील परिस्थितीत शा. नि. महसूल विभाग क्र.एनएए १२५३ दि. १०/८/५३ चे आदेशामधील परिच्छेद ३[२] मध्ये आता बदल करण्यात येत आहे.

४. सर्व जिल्हाधिकारी यांनी वरील आदेशाचे अनुषंगाने ज्यावेळी भूखंडाचा संमिश्र अकृषिक प्रयोजनासाठी वापर होत असेल [त्यामध्ये मजले असलेल्या इमारतीचाही समावेश राहील.] त्यावेळी अंशत: होणा-या प्रयोजनाच्या अनुषंगाने संबंधित नागरीक्षेत्रामध्ये प्रचलीत असणा-या अकृषिक आकारणीचे प्रमाणदराप्रमाणे आकारणी करण्याची कार्यवाही करावी.

५. हे आदेश सर्व महसूली अधिकारी यांचे निदर्शनास आणण्यात यावेत.

महाराष्ट्र शासनाचे राज्यपाल यांचे नावाने व
आदेशानुसार,

[ श्री. श्री. सरदेसाई. ]

कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.